# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग

परिपत्रक क्र. मुमाआ २०१९/प्र.क्र.५०/०१

१३ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२
दुरध्वनी क्र. २२०४९३९०/२२०४११८४

दिनांक : २५ जून, २०१९

**वाचा** :- १. शासन परिपत्रक क्र.केंमाअ-२००७/११८२/प्र.क्र.६५/०७/६ (मा.अ.), दिनांक १२.१२.२००७
२.शासन परिपत्रक क्र.केंमाअ-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/६, दिनांक ३१.०३.२००८

## -: परिपत्रक :-

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत कलम ६ (१) अन्वये केलेल्या माहिती अर्जास अनुसरुन काही वेळा जन माहिती अधिकारी माहिती देत नाहीत/अपूर्ण माहिती देतात/चुकीची माहिती देतात/टोलवाटोलवीची उत्तरे देतात, अशा प्रकरणी अर्जदार अधिनियमाच्या कलम १९ (१) अन्वये जन माहिती अधिकाऱ्यांपेक्षा वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे प्रथम अपील दाखल करतात. अशा प्रथम अपीलांवर प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन सुनावणी घेऊन अनुषंगिक आदेश देणे आवश्यक आहे. तसेच जर जन माहिती अधिकारी यांना प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी अर्जदारास माहिती पुरविण्याचे आदेश दिले असतील तर त्याची पूर्तता होते की नाही, याकडे लक्ष देणे ही प्रथम अपीलीय अधिकाऱ्याची जबाबदारी आहे.

राज्य शासनाने या संदर्भात यापूर्वी संदर्भाधीन परिपत्रकांन्वये जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांना सविस्तर सूचना दिलेल्या आहेत.

२. तथापि, राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयात प्राप्त होणाऱ्या तक्रारी/व्दितीय अपील सुनावणी दरम्यान आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, अनेकदा प्रथम अपील सुनावणी दरम्यान प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याने दिलेल्या आदेशांची जन माहिती अधिकाऱ्यांकडून पूर्तता होत नाही. अथवा सदर आदेशांची अंमलबजावणी व्हावी यासाठी प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी देखिल प्रयत्न केल्याचे आढळून येत नाहीत. परिणामस्वरुप अर्जदार व्यक्ती अपेक्षित माहिती मिळण्यापासून वंचित राहते. तसेच त्यांना राज्य माहिती आयोगासमोर नाईलाजाने अधिनियमाच्या कलम १९ (३) प्रमाणे व्दितीय अपील सादर करावे लागते. त्यामुळे राज्य माहिती आयोगाच्या स्तरावर मोठया प्रमाणात अपील व तक्रारीची संख्या वाढते व निर्णय होवून अर्जदारास प्रत्यक्ष माहिती मिळण्यास प्रदिर्घ कालावधी लागतो. त्यामुळे आवश्यक त्यावेळी माहिती मिळविण्याचा उद्देश सफल होत नाही.

माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम २० (१) व (२) प्रमाणे फक्त संबंधीत जन माहिती अधिकारी यांना शास्तीची/ शिस्तभंगाची तरतूद असून, प्रथम अपीलीय अधिकारी यांना शास्ती/शिस्तभंगाच्या कारवाईची तरतूद नाही व याची त्यांना जाणीव असल्याने बऱ्याच वेळा संबंधीत प्रथम अपीलीय अधिकारी प्रथम अपीलाच्या सुनावणीस दुर्लक्ष करतात किंवा सुस्पष्ट (Speaking Orders) आदेश न देता मोघम निर्णय

देतात. तसेच राज्य माहिती आयोगासमोरील व्दितीय अपील/तक्रार सुनावणीस देखिल अनुपस्थित असतात, ही अतिशय गंभीर बाब आहे.

३. वरील बाबी विचारात घेता, मा.राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी असे निर्देश दिले आहेत की, अपीलार्थींना माहिती देण्यात जन माहिती अधिकारी अयशस्वी झाला तर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सदर अर्जदार/अपीलार्थी यांना अपेक्षित माहिती पुरविण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत. जन माहिती अधिकारी हे माहिती पुरवित आहे किंवा नाही, याकडेही त्यांनी लक्ष ठेवावे. तसेच राज्य माहिती आयोगासमोरील व्दितीय अपील व तक्रार सुनावणीस संबंधित प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी उपस्थित राहणे बंधनकारक आहे. तथापि, अपवादात्मक परिस्थितीत अनुपस्थित राहावे लागल्यास सविस्तर कारणमिमांसेसह लेखी म्हणणे सुनावणीपूर्वी किंवा प्रतिनिधीमार्फत सुनावणी वेळी आयोगास सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी.

वरीलप्रमाणे यापुढे माहिती अधिकाराच्या प्रभावी अंमलबजावणीत जर प्रथम अपीलीय अधिकारी यांच्यास्तरावर निष्काळजीपणा/दुर्लक्ष झाल्याचे आयोगाच्या निदर्शनास आले तर संबंधित प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांच्या पदास लागू असलेल्या सेवा/शर्ती विचारात घेऊन संबंधितांविरुध्द प्रकरणपरत्वे अधिनियमाच्या कलम १९(८) (क) च्या तरतुदीनुसार शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस सक्षम/नियुक्ती प्राधिकाऱ्यास करण्यात येईल.

सदर निर्देश मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहेत.

**(श्या.र.चौरे)**
**सचिव (प्र.), राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र**

**प्रत :-**

१. राज्य मुख्य माहिती आयुक्त यांचे स्वीय सहाय्यक, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. सर्व राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई/कोकण (नवी मुंबई)/ पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.
३. प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.
४. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई.
५. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
६. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७. प्रबंधक, लोकआयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
८. मुख्य सचिवांचे सह सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
९. मंत्रालयीन विभागाचे सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव.
त्यांना विनंती की, सदर बाब त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व विभागीय कार्यालये/मंडळ/महामंडळ यांना निदर्शनास आणून देण्यात यावी.
१०. सर्व विभागीय आयुक्त.
११. सर्व जिल्हाधिकारी
१२. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१३. उपसचिव, सामान्य प्रशासन विभाग., कार्यासन क्र.६

E:\destop folders\Monali\D ०१\online अर्ज.docx